**एम.ए.सी.पी.क्र.१२३/२०२४**
**सविता वि. ज्ञानोबा**
**निशाणी क्र. ३०**

**पुढील सरतपासणी अर्जदारातर्फे विधीज्ञ श्री. ए. एम. साबळे यांचेमार्फत सुरु.**

**३.** मी माझ्या साक्षीचे शपथपत्र आज न्यायालयामध्ये दाखल केले आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे. मला आता एक पगाराचे प्रमाणपत्र दाखविण्यात आले. ते मीच दिलेले आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. ते पगारपत्रक **नि.क्र. ३३** वर आहे. माझ्या शेताचा सातबारा उतारा मी आज न्यायालयामध्ये दाखल केला आहे. तो **नि.क्र. ३४** वर आहे. माझ्या आधारकार्डची छायांकित प्रत मी न्यायालयामध्ये दाखल केलेली आहे. ती **नि.क्र. ३५** वर आहे. मला आता दोन नौकरनामे दाखविण्यात आले. त्यावर माझ्या सह्या आहेत. त्यात लिहिलेला मजकूर माझ्या मुलाच्या हस्ताक्षरात आहे व तो बरोबर आहे. ते नौकरनामे **नि.क्र. ३६** आणि **३७** वर आहेत.

**उलटतपास सामनेवाला क्र. १ व २ तर्फे**

**बिनाजबाब आदेश पारीत. अधिवक्ता व पक्षकार गैरहजर. सबब उलटतपास नाही.**

**फेरतपास नाही.**

**‘श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत’**

**Sd/-**

**दिनांक:०७/०७/२०२६**

**( श्री. आर. बी. भागवत)**
**जिल्हा न्यायाधीश—२, लातूर तथा**
**सदस्य मोटर अपघात प्राधिकरण**